जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात गुरुवारपासून व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) उपक्रमांतर्गत अमेरिकेतील ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची गुरुवार (दि. १४) ते बुधवार (दि. २०) दरम्यान शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने होणार आहेत. अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण प्रा. ब्राऊन व्याख्यानांद्वारे करणार आहेत.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत ग्यान या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विधि अधिविभागातर्फे अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची व्याख्यानमाला होणार आहे. 'अंडरस्टँडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अंडर द युनायटेड स्टेट्स एन्ड इंडियन कॉन्स्टिट्यूशन : अ कम्पॅरॅटिव्ह अॅनालिसीस' या विषयावर ते व्याख्याने देतील. जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरुममध्ये या व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असतील, अशी माहिती ग्यान उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2017
तरुण भारत

# विद्यापीठात शुक्रवारी 'ग्यान'उपक्रमांतर्गत व्याख्यान

**कोल्हापूर :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्यान" उपक्रमांतर्गत अमेरिकेतील ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. मार्क डेव्हीड ब्राऊन यांचे १४ ते २० डिसेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठात विविध विषयावर व्याख्याने होणार आहेत. कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.ए. लव्हेकर यांच्या हस्ते गुरूवारी सकाळी १० वाजता उद्घाटन होणार आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकेडेमिक नेटवर्क" (ग्यान) या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विधि अधिविभागातर्फे १४ डिसेंबरपासून अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रा.डॉ. मार्क डेव्हीड ब्राऊन यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. 'अन्डरस्टँडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अन्डर द युनायटेड स्टेटस् अॅन्ड इंडियन कॉन्स्टिट्यूशन: अकम्पॅरेटिव्ह अॅनालिसिस" या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरुममध्ये व्याख्यान होईल. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या 'ग्यान" उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर.के. कामत आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही.वाय. धुपदाळे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2017
तरूण भारत

# स्टुडंट कौन्सिलची निवडणूक प्रक्रिया १ जानेवारीपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ यात सुधारणा करीत शैक्षणिक वर्ष २०१७–१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूक प्रक्रियेला एक जानेवारीपासून प्रारंभ होणार असून, ही निवडणूक प्रक्रिया २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्टुडंट कौन्सिलचा निवडणूक कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. या निवडणूक कार्यक्रमावर कुलगुरूंची सही झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.



- २८ फेब्रुवारी २०१८ पुर्वी स्टुडंट कौन्सिलची निवडणूक प्रक्रिया पार पडणार
- विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागातर्फे निवडणूकीच्या तयारीला प्रारंभ

महाविद्यालयीन निवडणुकीमधील राजकीय हस्तक्षेप, त्यातून होणारे गैरप्रकार आदी कारणास्तव १९९४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार गुणवत्तेवर स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका घेतल्या जात होत्या. यंदाही राज्यपाल विद्यासागर राव यांनी दिलेल्या आदेशानुसार २०१७–१८ या शैक्षणिक वर्षासाठी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका' मेरीटवर घेतल्या जाणार आहेत. ही निवडणूक प्रक्रिया १ जानेवारीपासून सुरू होणार आहे. पुढच्या आठवड्यात महाविद्यालयांनाही 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूक' संदर्भात सूचना दिल्या जाणार आहेत. निवडणूकीच्य तयारीत विद्यार्थी विकास विभाग व्यस्त असल्याचे चित्र आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2017
पुण्यनगरी

# नॅक मूल्यांकनावर आज राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महावीर महाविद्यालयात राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद - नॅक यांचेकडून नव्याने कार्यान्वित झालेल्या मूल्यांकन पद्धतीबाबत महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षमार्फत बुधवार, दि. १३ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून परिषदेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, कार्यवाह एम. बी. देसाई उपस्थित राहणार आहेत. नॅकचे डेप्युटी ॲडव्हायझर डॉ. गणेश हेगडे बीजभाषण देणार आहेत. या परिषदेत विविध सत्रांमध्ये नॅक पिअर टीम मेंबर डॉ. शिरीष चिंधडे, पुणे, डॉ. विनायक शिरगुरकर, पुणे, डॉ. एच. व्ही. देशपांडे, कोल्हापूर यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2017
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलांच्या बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकाबलेल्या कॉमर्स कॉलेजच्या संघाचा गौरव करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील. शेजारी शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे.

# विद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत कॉमर्स कॉलेजला अजिंक्यपद

प्रतिनिधी

कोल्हापूर.

कोल्हापूरातील कॉमर्स कॉलेजच्या संघाने अंतिम सामन्यात साताऱ्याच्या डी. पी. भोसले महाविद्यालय संघाचा ४–१ गुणफरकाने पराभव करत शिवाजी विद्यापीठ. आंतरविभागीय मुलांच्या बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकावले. अक्षय मनवाडकर, मल्हार कुलकर्णी, पौरस कुलकर्णी, हृषिकेश माने, आदित्य कांबळे अशी जेतेपद मिळविलेल्या संघातील खेळाडूंची नावे आहेत. सांगलीच्या अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे ही स्पर्धा झाली. बक्षीस समारंभात या संघाला एसजीएस मनुश्री चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील कामगिरीबद्दल कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते संघातील खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या संघाला शारिरीक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रा. प्रकुल मांगोरे–पाटील, तन्मय कर्माकर, निनाद कामत यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

13 DEC 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर विभागीय महिला क्रिकेट : कमला कॉलेजची हॅट्ट्रिक

**क्रीडा वृत्त**

प्रतिनिधी
जयसिंगपूर

शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ९ विकेट राखून पराभव करून सलग तिसऱ्या वर्षी कमला कॉलेजने विजेतपद पटकाविले. श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयाने स्पर्धेचे संयोजन नगरपालिकेच्या स्टेडियमवर केले होते.

स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा डॉ. निता माने यांच्या हस्ते झाले. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील आठ महाविद्यालयांनी भाग घेतला. जयसिंगपूर कॉलेजने कन्या महाविद्यालयाचा तर इंजिनिअरींग कॉलेजने वारणानगरचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. गतविजेत्या कमला कॉलेजने कन्या महविद्यालय इचलकरंजी आणि जे. पी. नाईक उत्तूरचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत नाणेफेक जिंकून जे.जे. मगदूम कॉलेजने प्रथम फलंदाजी करीत ५१ धावा केल्या. तर कमला कॉलेजच्या समिक्षा पाटीलच्या २४ आणि गिरीजा बोडेकरच्या ११ धावांच्या मोबदल्यात ९ विकेट राखून विजेतपदाची हैटट्रिक केली.



**जयसिंगपूर : नाणेफेक करून महिला क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना नगराध्यक्षा डॉ. नीता माने. सोबत प्रा. जहाँगीर तांबोळी, प्रा. रविंद्र काक्रंबे, प्रा. महादेव सूर्यवंशी, अमोल्ल भोजणे आदी.**

विजयी संघाना जयसिंगपूर कॉलेजचे प्राचार्य बी. एस. राठोड, प्रा. संजय पाटील, प्रा. सुधिर वाटवे आणि प्रा. सौ. स्वाती बस्तवाडे यांच्या हस्ते कायम चषक देण्यात आले. स्पर्धेचे संयोजन प्रा. जहाँगीर तांबोळी, प्रा. रविंद्र काकंब्रे, अमोल भोजणे यांनी केले. पंच म्हणून लक्ष्मण पडियार, तुषार भिसे, सद्दाम तांबोळी, पंकज शहा यांनी काम पाहिले.